उपस्थित होते.

एईएमएलकडून डिजिटल पेमेंट मोड्सची सुविधा

ग्राहकांना घरातच राहण्याचे आणि सोशल डिस्टन्सिंग ठेवण्याचे आवाहन

प्रतिनिधी

मुंबई, शनिवार - केंद्र व राज्य सरकारने महामारी कोरोना व्हायरससंदर्भात जारी केलेल्या सूचनेनंतर एईएमएलने आपल्या ग्राहकांना घरातच राहत डिजिटल पेमेंट मोड्स सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. ग्राहक घरातच राहून सोशल डिस्टन्सिंग राखतील, या खात्रीसाठी कंपनीने सोसायटीत सेल्फ-हेल्प पेमेण्ट किओस्क, ड्राप बॉक्सेसची सुविधा दिली आहे. एईएमएलने महाराष्ट्र विद्युत नियामक महामंडळाला वितरण परवाना नियमन २००६, ८.६.८ च्या सामान्य स्थितीतर्गत महामारी आजाराच्या परिणामांचे निर्मूलन उपक्रमांबाबतदेखील कळवले आहे.

एईएमएलला कोरोना व्हायरसमुळे सेवा निलंबित होणे, मुदतीपूर्वीच सेवा खंडित होणे, युटिलिटी कट-ऑफ्स याबाबत चिंता आहे आणि कंपनीकडे पुरवठा सुधार करण्यासंदर्भात आणि सुरक्षा संबंधित तक्रारी केल्या जात आहेत. ग्राहक अदाणी इलेक्ट्रिसिटी मोबाइल ॲपच्या माध्यमातून बिलसंदर्भात माहिती प्राप्त करू शकतात आणि १८००५३२९९९८ क्रमांकावर मिस्ड कॉल देत नो सप्लाय तक्रारींची नोंद करू शकतात. तसेच ग्राहक पेटीएम, गुगल पे, ॲमेझॉन पे, फोनप, बीएचआयएम, मोबिक्विक आणि फ्रीचार्ज अशा ऑनलाइन पेमेंट मोड्सच्या माध्यमातून बिल देयके भरू शकतात. ग्राहक व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी मीटर रिडिंग, बिलिंग, बिल कलेक्शन, नवीन कनेक्शन्स जोडणी अशा मानवी इंटरफेससह इतर सेवा ३१ मार्च २०२० पर्यंत खंडित करण्यात आल्या आहेत. एईएमएल सतत स्थितीचे अवलोकन करत आहे आणि सद्यपरिस्थितीला अनुसरून सेवा पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न करत आहे.